जा. क्र. माध्य. ३/प्रथम मान्यता/पुवि
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे :- १ यांचे कार्यालय.
दि. :- 31 AUG 1995

प्रति,

मा. शिक्षणाधिकारी [माध्यमिक],
जिल्हा परिषद, पुणे.

विषय :- प्रथम मान्यता.
श्री. संत गाडगेमहाराज विद्यानिकेतन पिंपळगांव, जोगा, ता. जुन्नर.

संदर्भ :- आपले पत्र क्र.शिक्षण/माध्य/ह-४/९४-९५, दिनांक २३. ७. ९५.

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३. १, ३. २, ३. ३, अन्वये श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळ. संस्थेच्या श्री. संत गाडगेमहाराज विद्यालय, पिंपळगांव जोगा. मराठी माध्यमिक शाळेच्या इयत्ता ८वी /९वी /१०वी च्या वर्गास सन १९९४ - १९९५ या शैक्षणिक वर्षासाठी जून १९९४ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थेने स्वत:च्या मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयावर प्रयोगशाळा सर्व साहित्यानीशी उपलब्ध करुन द्यावी.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे.
६] पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन द्यावा.
७] स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन द्यावी.
८] वाढीव फी चे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९] शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१० ] कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११ ] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२ ] विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३ ]
१४ ]
१५ ]

स्वाक्षरीवर शि. उ. सं. यांची
सही असे

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत :- मुख्याध्यापक,
श्री. संत गाडगेमहाराज विद्यानिकेतन

"यशवंतराव चव्हाण भवन "
जिल्हा परिषद पुणे. शिक्षण माध्यमिक,
शिक्षण/माध्य/ह-४/प्रथम मान्यता/९६-९७/९२३
पुणे दि. २५।२।९७.
कार्यालय

प्रति,

**BOOK-POST**

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
संत गाडगे महाराज विद्या निकेतन पिंपळगाव जोगा ता जुन्नर

ITO /D 1(1). PUNE

विषय :- इ.१०वी वर्गास प्रथम मान्यता सन ९६-९७.

संदर्भ :- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे
कडील पत्र क्रं. माध्य ३/प्रथम मान्यता/पुवि/ ९६
दि. —

PIMPALGAON JOGA B.O. PUNE

उपरोक्त विषयसंदर्भान्वये आपल्या संत गाडगे महा. विद्या निकेतन - पिंपळगाव जोगा या मराठी/इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक विद्यालयातील इयत्ता १०वी च्या वर्गास खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर सन १९९६ - ९७. या शैक्षणिक वर्षापासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

१] संस्थेने मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा साहित्य उपलब्ध करुन द्यावे.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन ग्रंथाची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर उपलब्ध करावे.
६] पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन द्यावा.
७] [illegible] अनुभव, व क्रीडा साहित्य उपलब्ध करुन द्यावे.
८] शैक्षणिक साहित्याचा अध्यापनात वापर असावा.
९] स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करुन द्यावी.
१०] वाढीव फीचे दर मा. शि. संचालक, महरा. पुणे यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
११] माध्यमिक शाळा संहितेनुसार शालेय रेकॉर्ड असावे.
१२] कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
१३] शिक्षकांचा भविष्य निर्वाह निधी.. खाती उघडावीत.
१४] विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करुन घेण्यात यावी.
१५] अभ्यासेतर कार्यक्रम, विविध स्पर्धा व परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग असावा.

(signature) ३।३।९७

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/नै.वाढ/९
पुणे, दि. १८/८/९५

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

~~श्री संत गाडगे महाराज विद्यालय, पिंपळगाव जोगा,~~
~~ता जुन्नर जि पुणे.~~

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.

सन १९९५-९६, ~~इ.६~~ वी, ~~७वी~~, ९वी, ~~१०वी~~.

आपल्या ~~श्रीराम शिक्षण प्रसा. मंडळ.~~ द्वारा संचलित ~~श्री संत गाडगे महा. विद्या.~~ ह्या माध्यमिक शाळेतील इ.८वी/~~५ वी~~ चे वर्गास ( माध्यम मराठी/~~इंग्रजी~~ ) सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षापासून मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य २(७)नमाशा/मान्यता/पुवि/९४ दि.१८/७/९५ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ.~~६ वी~~, ~~७ वी~~, ९ वी, ~~१० वी~~ चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत असून सदर वर्गास परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी ~~उपशिक्षणाधिकारी, शिक्षण-माध्यमिक, जि.प.पुणे~~/ गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती जुन्नर यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वी वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे त्या माध्य. शाळांनी मा.विभागीय सचिव,महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयात संकेतांक मिळणेसाठी लागणारी कागदपत्रे माहे जून मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

(स्वाक्षरी)

शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे करिता

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै.वाढ/९६
पुणे, दि. ८/७/९६

प्रति,

BOOK-POST

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

संत गाडगे महा. विद्यालय, पिंपळगाव जोगा,
ता. जुन्नर, जि. पुणे.

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.

सन १९९६-९७, इ. ६ वी, ७वी, ९वी, १०वी.

आपल्या श्रीराम शि. प्रसा. मंडळ द्वारा संचालित संत गाडगे महा. विद्या. पिंपळगाव जोगा या माध्यमिक शाळेतील इ. ८वी/ ५ वी चे वर्गास ( माध्यम मराठी/इंग्रजी ) सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य ३(ग)नमाशा/मान्यता/पुवि/९४ दि. २०/२/९५ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ. ६ वी, ७ वी, ९ वी, १० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत असून सदर वर्गास परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी उपशिक्षणाधिकारी, शिक्षण-माध्यमिक जि.प. पुणे/ गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती जुन्नर यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वी वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे त्या माध्य. शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयात संकेतांक मिळणेसाठी लागणारी कागदपत्रे माहे जून मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

(सही) ९.७.९६

शिक्षणाधिकारी (माध्य)